आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२३ जानेवारी २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या रोजगार मेळ्यात सरकारी नोकरी मिळालेल्या ६१ हजार जणांना दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्रांचं वाटप करणार

- चांदीचा दर १८ हजार रुपयांनी वधारला, सेन्सेक्स ७७० अंकांनी घसरुन ८२ हजारांच्या खाली, निफ्टी २५ हजारांच्या उंबरठ्यावर

- न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा भारताचा निर्णय

**आणि**

- रणजी करंडकात हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात, सर्फराज खानच्या द्विशतकाच्या जोरावर मुंबई भक्कम स्थितीत

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या १८व्या रोजगार मेळ्यात विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या ६१ हजार जणांना दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्रांचं वाटप करणार आहेत. या कार्यक्रमाला ते संबोधितही करतील. हा रोजगार मेळा देशभरात ४५ ठिकाणी होणार आहे.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिन संचलनाची रंगीत तालीम आज नवी दिल्लीत कर्तव्य पथावर झाली. भारताचा समृद्ध वारसा, लष्करी सामर्थ्य, सांस्कृतिक वैविध्य यांचं प्रतिबिंब या कार्यक्रमात प्रकर्षानं दिसून आलं. संरक्षण दलाच्या विविध कवायत तुकड्या तसंच राज्य , केंद्रशासित प्रदेश , काही मंत्रालयं आणि विभाग यांच्या चित्ररथांनी प्रजासत्ताक दिनाची उत्सुकता वाढवली आहे.

**<><><><><>**

७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या संचलनात ऑपरेशन सिंदूरमध्ये देशानं मिळवलेला विजय आणि तीनही दलांचा समन्वय यांचं दर्शन घडवणारा लष्कराचा चित्ररथ पाहायला मिळेल, असं दिल्ली उपविभागाचे चीफ ऑफ स्टाफ मेजर जनरल नवराज धिल्लों यांनी आज सांगितलं. रणगाडे, क्षेपणास्त्र प्रणाली, ड्रोन यांच्या सहाय्यानं प्रथमच युद्धभूमीवरील रचना सादर केली जाणार आहे. सुमारे ६ हजार ५० सैनिक यात सहभागी होणार असून लेफ्टनंट जनरल भवनीश कुमार चौथ्यांदा नेतृत्व करणार आहेत. पहिल्यांदाच भैरव बटालियन, शक्तिवान रेजिमेंट आणि लडाख स्काऊट संचलनात भाग घेणार आहेत. झान्स्कर इथले घोडे, दुहेरी कुबड असलेले उंट तसंच घारींचाही समावेश यात असणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्यात विविध कल्याणकारी योजना राबवल्या जाणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

घरोघरी आरोग्य तपासणीची सुविधा देणारी आरोग्य आपल्या दारी मोहीम प्रथम मुंबईत आणि नंतर राज्यात इतरत्र राबवली जाईल, प्लास्टिक मुक्त गड किल्ले अभियान जागतिक वारसा यादीतल्या ११ किल्ल्यांवर आणि नंतर इतर किल्ल्यांवर राबवलं जाईल, त्यात सहभागी स्वयंसेवी संस्थांना १ लाख रुपये मानधन मिळेल, महिला बचत गट सक्षमीकरण, मराठी भाषा संवर्धन, रस्ता सुरक्षा, ज्येष्ठांसाठी एसटी संगे तीर्थाटन, या कामांसाठी प्रत्येकी १०० कोटी रुपये तरतूद असेल, असं त्यांनी सांगितलं…

**होल्ड - एकनाथ शिंदे बाइट**

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताव्दीनिमित्त माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांना आज मुंबईत संयुक्त सभा आयोजित केली आहे. यावेळी राज ठाकरे यांनी बाळासाहोबांच्या आठवणी जागवतानाच, सध्याच्या राजकीय स्थितीबद्दल खंत व्यक्त केली.

<><><><>

लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापनाविषयी नवी दिल्लीत आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचा आज समारोप झाला. ३ दिवस चाललेल्या या परिषदेत विविध देशांचे १०० पेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी झाले होते. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी समारोपाच्या सत्रात परिषदेचा दिल्ली जाहीरनामा वाचून दाखवला आणि सर्व सहभागी संस्थांच्या प्रतिनिधींनी तो एकमतानं स्वीकारला. मतदार याद्यांची शुद्धता, निवडणूक प्रक्रीया करणे, संशोधन आणि प्रकाशन, क्षमतावाढीसाठी तंत्रज्ञानाचा वापर या प्रमुख तत्वांवर काम करण्यासाठी सर्वांनी सहमती दर्शवली. निवडणूक प्रक्रीया सोपी आणि पारदर्शक व्हावी याकरता निवडणूक व्यवस्थापन संस्थांनी मतदारांना छायाचित्रासह ओळखपत्रं द्यावी असं आवाहन ज्ञानेश कुमार यांनी केलं.

निवडणूकविषयक व्यवस्थापनाच्या दृष्टीनं ही परिषद उद्बोधक ठरल्याची प्रतिक्रीया देशोदेशीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

<><><><>

तिरुवनंतपुरमला देशातल्या अग्रगण्य शहरांपैकी एक बनवण्यासाठी केंद्राकडून संपूर्ण सहाय्य  केलं जाईल, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिलं. ते  तिरुवनंतपुरममध्ये भाजपा कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. डावी आघाडी आणि संयुक्त आघाडी या दोघांनीही केरळला भ्रष्टाचार, गैर व्यवस्थापन, तुष्टीकरणाचं राजकारण  अशा दुष्टचक्रात ढकललं आहे, अशी टीका त्यांनी केली.

राज्यात भाजपाचं सरकार आल्यावर सबरीमला सुवर्ण चोरी प्रकरणाचा छडा लावून गुन्हेगारांना शिक्षा केली जाईल, असं ते म्हणाले.

<><><><>

गेल्या काही वर्षांमध्ये तमिळनाडूमधल्या द्रमुक तसंच काँग्रेस सरकारांनी राज्याला विकासापासून वंचित ठेवलं आहे, अशा अकार्यक्षम सत्ताधाऱ्यांपासून सुटका करून घेण्याची राज्यातल्या जनतेची इच्छा आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हचलं आहे. ते आज मदुरंथकम इथं जाहीर सभेत बोलत होते. राज्यात भाजपाचं डबल इंजिन सरकार आलं तर अनेक योजना चांगल्या पद्धतीनं राबवता येतील, असं ते म्हणाले.

<><><><>

मुंबईच्या सराफा बाजारात आज चांदी पुन्हा सुमारे १८ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं करांसह एक किलो चांदीसाठी ३ लाख २७ हजार रुपयांहून अधिक रक्कम मोजावी लागत होती. या तेजीमुळं चांदीच्या दरांमधली कालची १९ हजार रुपयांची घसरण भरुन निघाली. सोनं आज तोळ्यामागे सुमारे ३ हजार रुपयांनी महाग झालं. त्यामुळं एक तोळा २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ५९ हजारांच्या पलीकडे आणि २२ कॅरेट सोन्याचा दर १ लाख ५५ हजार रुपयांच्या पलीकडे गेला होता. शेअर बाजारातली कालची तेजी औट घटकेची ठरली आणि सेन्सेक्स पुन्हा ७७० अंकांनी घसरुन ८१ हजार ५३८ अंकांवर बंद झाला. निफ्टीमध्येही २४१ अंकांची घट झाली आणि हा निर्देशांक २५ हजार ४९ अंकांवर बंद झाला. डॉलरच्या तुलनेत रुपयानं आज ९२ रुपयांच्या पातळीला स्पर्श केला. तसंच गुंतवणूकदारांनी सर्वदूर विक्री केल्यानं शेअर बाजारात घसरण दिसून आली.

<><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आज रायपूरमध्ये सुरू आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण

करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या १३ व्या षटकात ५ बाद १२९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात ड गटात इथं सुरु असलेल्या हैदराबादविरुद्धच्या सामन्यात, आज दुसऱ्या दिवशी, सर्फराज खानच्या द्विशतकी खेळीच्या बळावर मुंबईनं आपली बाजू भक्कम केली. कालच्या ४ बाद ३३२ धावांवरुन आज पुढचा खेळ सुरु झाल्यावर सर्फराज खाननं द्विशतक पूर्ण केलं. २२९ चेंडूत २२७ धावा करताना त्यानं १९ चौकार आणि ९ षटकार ठोकले. सुवेद पारकरनं ७५, तर अथर्व अंकोलेकरनं नाबाद ३५ धावा केल्या. त्यामुळे मुंबईला पहिल्या डावात ५६० धावांचा डोंगर उभा करता आला. हैदराबादच्या पहिल्या डावात त्यांचे सलामीचे फलंदाज झटपट बाद झाले. मात्र नंतर, राहुल सिंग आणि कोडीमेला हिमतेज यांनी डाव सावरला. दिवस अखेर हैदराबादच्या २ बाद १३८ धावा झाल्या होत्या. राहुल ८२, तर हिमतेज ४० धावांवर खेळत होता. ब गटात पुण्यात सुरु असलेल्या सामन्यात आज दिवसअखेर महाराष्ट्रानं गोव्यावर ९७ धावांची आघाडी घेतली. आजचा खेळ थांबला तेव्हा महाराष्ट्राच्या ८ बाद ३०६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

इंडोनेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत आज पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन या भारताच्या दोन्ही बॅडमिंटनपटूंना एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत पराभवाचा धक्का बसला. चीनच्या चेन यू फेई हिनं पी. व्ही. सिंधूवर २१-१३, २१-१७ अशी मात केली, तर पुरुष एकेरीत लक्ष्य सेनला थायलंडच्या खेळाडूनं २१-१८, २२-२० असं नमवलं.

//<><><><><>//